**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम
योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०%
भाग लाभार्थ्यांनी उचलण्याची
अट शिथिल करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक :ग्रापापु-१०००/ प्र.क्र. ८५/ पापु- ०७
मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३ मे, २००१.**

**वाचा :-** १) शासन निर्णय, पा.प.व स्व.वि.क्र.ग्रापापु १०९९/प्र.क्र. ३२८/ पापु-०७ दि. २७ जुलै, २०००
२) शासन परिपत्रक पा.प.व स्व.वि.क्र संकीर्ण २००० / शिकाना दि. ११/१२/२०००
३) शासन निर्णय नि.वि.क्र. स्थायिका २०००/ प्र.क्र.३२०/ का १४४५ दि. ३/११/२०००

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी लागू केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना क्रं. १ येथील दिनांक २७/०७/२००० च्या शासन निर्णयान्वये राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी व केंद्राच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमामध्ये **"लोकसहभाग"** अत्यावश्यक करण्यात आला असून या लोकसहभागाचा एक भाग म्हणून योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी उचलणे बंधनकारक करण्यात आले आहे.

२. योजनेच्या भांडवली खर्चाचा १०% भाग लाभार्थ्यांनी उचलण्याची घातलेली अट रद्द करण्याबाबत विविध स्तरावरुन निवेदने प्राप्त झाली होती. राज्यातील टंचाईची परिस्थिती व त्यासाठी करावयाच्या उपाययोजना विचारात घेऊन काही बाबींमध्ये योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी उचलण्यात घालण्यात आलेली अट रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



४०५

**शासन निर्णयः-**

वरील विवेचन लक्षात घेता शासन निर्णय. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु १०९९/ प्र.क्र३२८/ पापु-०७ दिनांक २७ जुलै.२००० अन्वये योजनेच्या भांडवली खर्चाच्या १०% भाग लाभार्थ्यांनी उचलण्याची अट फक्त पुढील बाबी करीता शिथील करण्यास शासन मंजूरी देत आहे.

१) टंचाई आराखडयातून घ्यावयाच्या उपाय योजना (विशेष बाबी सहीत)

२) मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात येणा-या पाणी पुरवठा योजना.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
संचालक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७.



४०३